# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ८३२/२०२२/जळगाव**

| | | |
|---|---|---|
| १ श्री.जगदिश पुरनचंद अग्रवाल,<br>रा.५, पोलन पेठ, विसनजी नगर,<br>जळगाव, ता.जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>सहायक आयुक्त (अन्न),<br>अन्न व औषध प्रशासन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>मार्केट, पहिला माळा, एफ १४ ते १६, जळगाव,<br>ता.जि.जळगाव-४२५००१ | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सह आयुक्त (अन्न),<br>अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,<br>५ वा मजला, हॉल क्र.२१, उद्योग भवन,<br>त्र्यंबकरोड सातपूर, नाशिक, ता.जि.नाशिक. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक – १०/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दि.०४/०२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी परवान्याची प्रत दिली मात्र अन्य कोणतीही कागदपत्रे दिली नाहीत, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१०/०६/२०२२ रोजी meet.google.com/qfw-eukk-ubv या गुगल मिट कोडद्वारे ऑनलाईन आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** तत्कालीन जन माहिती अधिकारी

अपिलार्थी यांनी दि.२८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये कैला माता ट्रेडींग कंपनी, सुनिल हरिशंकर अग्रवाल यांना १) फुड लायसन्स देण्यापूर्वी घेण्यात आलेली कागदपत्रे. २) दुकान जागेचा नकाशा. ३) दुकान जागेचा फोटो. ४) फुड लायसन्सची प्रत. ५) दुकान व गोडाऊन जागेचा पत्ता. ६) सिटी सर्व्हे उताऱ्याची प्रत याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दि.२४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर पेढीने आपणास माहिती देण्यास दि.२३/११/२०२१ च्या पत्रान्वये आक्षेप घेतलेला आहे. त्यामुळे सदर माहिती देता येणार नाही, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि.३०/११/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि.१३/०१/२०२२ रोजी सुनावणी घेऊन अनुज्ञप्ती आणि काही कागदपत्रे ही वैयक्तिक स्वरुपाची नाहीत त्यामुळे वैयक्तिक नसलेली कागदपत्रे ७ दिवसात अर्जदारास पुरवावीत, असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१९/०१/२०२० च्या पत्रान्वये परवान्याची प्रत आणि संगणकीय प्रणालीवर उपलब्ध Form B ची प्रत उपलब्ध करुन दिली.

सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी नमूद केले की, माहिती अर्जान्वये कैला माता ट्रेडींग कंपनी संदर्भातील माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी यांनी नंदकुमार स्टोअर्सची माहिती दिली आहे. तरी मागितलेली माहिती मिळावी, अशी विनंती केली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस प्रथम अपील आदेशानुसार दिनांक १९/०१/२०२२ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे नंदकुमार स्टोअर्सची माहिती पुरविल्याचे दिसुन येते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती न पुरविता अन्य माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मध्ये द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार शिफारस करणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक मान्य करण्यात येत आहे.

२) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन, जळगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

३) श्री.व्ही.पी.पाटील, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन, जळगाव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त

झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

४) आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

५) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ८३२/२०२२/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, दुसरा मजला सर्व्हे नं.३४१.बांद्रा कुर्ला संकुल, रिझर्व्ह बँकेसमोर, वांद्रे ( पूर्व), मुंबई -४०० ०५१.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.व्ही.पी.पाटील (तत्कालीन जन माहिती अधिकारी) सहायक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट, पहिला माळा, एफ १४ ते १६, जळगाव, ता.जि.जळगाव-४२५००१.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.८३२/२०२२/जळगाव/ जा-१६६५ दिनांक- १०/०८/2022